# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./७६८५/२०२१ दि.२६/११/२०२१

## परिपत्रक

**विषय :- कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती गठीत करणेबाबत तसेच समिती फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी , जिल्हा अधिकारी स्थानिक तक्रार निवारण समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी गडचिरोली यांचे पत्र क्र. जाक्र. जिमबाविअधि/गड/अंतस/२०२१- २२/९३३ दिनांक २९/१०/२०२१.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना याद्वारे कळविण्यात येत की, संदर्भिय प्राप्त पत्राचे अनुषंगाने कार्यवाही घेवून त्याबाबतचा अहवाल विद्यापीठ प्रशासनाला कळविण्यात यावा.

26.11.2021

**(डॉ. अनिल चिताडे)**
**कुलसचिव (प्र.)**
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी :-**

१) मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र- कुलगुरुंचे यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३) मा. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी , गडचिरोली.
४) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.
५) सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
६) आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

26.11.2021

**(डॉ. कामाजी देशमुख)**
**उपकुलसचिव(प्र.)**
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 12518 दि. 23/11/2021
जावक क्र. ........ दि. ........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 7250 दि. 20/11/21
जावक क्र. 10341 दि. 23/11/21

# जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय,गडचिरोली.

बॅरेक क्रमांक १ खोली क्रमांक२६,२७ जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कॉम्पलेक्स गडचिरोली
दुरध्वनी क्रं.- ०७१३२-२२२६४५, e-mail- dwcdgadchiroli@gmail.com

जाक्र/जिमवबाविअधि/गड/अंतस/२०२१-२२ / ९३३ दिनांकः- २९/१०/२०२१

**अति महत्तवाचे/ तात्काळ**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
आवक 8517 दि. 11/11/21
जावक 8517 दि. 11/11/21

प्रति,
मा. कुलगुरू
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 1654 दि. 11/11/2021
जावक क्र. 2030 दि. 18/11/2021

**विषय :- कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती गठीत करणेबाबत तसेच समिती फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याबाबत.**

संदर्भ :- १.कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ व नियम दि. ९/१२/२०१३.
२.महिला व बाल विकास विभाग शासान निर्णय क्रं.मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक-दि.१९-६-२०१४ .
३.महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रं.मकचौ-२०१४/प्र.क्र.६३/मकक-दि.११-९-२०१४.

महोदय,

उपरोक्त नमूद अधिनियम तसेच शासननिर्णयाप्रमाणे सर्व शासकीय, निमशासकीय खाजगी कार्यालये, शासनाने किंवा स्थानिक्र प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी किंवा महामंडळ किंवा सहकारी सोसायटी यांनी स्थापन केलेले किंवा त्यांच्या मालकीचे किंवा ते नियंत्रित करीत असेलेले, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संपुर्ण किंवा अंशतः अनुदान दिलेले कोणतेही खाते, विभाग, संघटना, ताबा घेतलेली संस्था, अंगीकृत संस्था, आस्थापना, उदयोग, संस्था, कार्यालय, शाखा, युनीट, व्यापारी, व्यावसायिक, व्यावसायिक शिक्षण, शैक्षणिक, करमणुकीच्या, औदयगीक, वैदयकीय सेवा देणारी किंवा आर्थिक उत्पादन, पुरवठा, विक्री, वितरण, किंवा सेवा देणारी खाजगी क्षेत्रातील कोणतीही संघटना, खाजगी नाविण्यपूर्ण धंदा, अंगीकृत उदयोग, संस्था, आस्थापना, सोसायटी, अशासकीय संस्था (NGO), शाखा, युनीट किंवा सेवा पुरवठादार, इस्पितळे किंवा सुश्रुषा गृहे, कोणतीही क्रीडा संस्था, स्टेडियम, क्रीडा संकुल, किंवा स्पर्धा किंवा खेळाचे ठिकाण जे निवासी असेल किंवा प्रशिक्षण, क्रीडा किंवा त्या संबंधींत वापरले जात असेल **अश्या सर्व कामाच्या ठिकाणी जिथे १० किंवा १० पेक्षा जास्त (महिला आणि पुरुष) कर्मचारी कार्यरत असेल त्या सर्व कामाच्या ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्यात यावी त्यासोबतच जिथे १० पेक्षा कमी कर्मचारी कार्यरत आहेत किंवा ज्यांची मालका विरुध्द तक्रार आहे आणि असंघटित क्षेत्रातील कर्मचारी महिला हया लैगिक छळाच्या तक्रारी समन्वय अधिकारी - बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण)संबंधित तालुका करिता तसेच शहरी**

**भागाकरिता बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) )मार्फत स्थानिक तक्रार समिती -जिल्हा महिला बाल विकास अधिकारी गडचिरोली कडे करु शकतात याबाबत माहिती सर्व कामाच्या ठिकाणी दयावी.**

कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे हे अधिनियमानुसार अनिवार्य आहे. जे कार्यालय समिती स्थापन करणार नाही त्या कार्यालयाच्या **मालकाला ५००००/- रुपये दंड आकारण्यात येईल** असे अधिनियमात **कलम २६** मध्ये नमूद आहे. ज्या कामाच्या ठिकाणी १० किंवा त्यापेक्षा अधिक अधिकारी / कर्मचारी (महिला आणि पुरुष) कार्यरत आहेत त्या उपरोक्त नमूद सर्व कामाच्या ठिकाणी सदर समिती गठीत करणे अनिवार्य आहे. **सदर समिती जर आधीच गठीत असेल तर ती उपरोक्त कायदा व शासननिर्णयानुसार पुर्नगठीत करण्यात यावी. तसेच सर्व विभागप्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांना शासननिर्णयानुसार समिती गठीत करण्याबाबत सुचित करावे.** समितीची रचना उपरोक्त नमुद संदर्भ क्रं. १ च्या कायदयाप्रमाणे आणि संदर्भ क्रं. २ च्या शासन निर्णयाप्रमाणे करण्यासाठी प्रत्येक कार्यालयानी अंतर्गत तक्रार समिती खालीलप्रमाणे गठीत करणे अंत्यत आवश्यक आहे.

**अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्याकरिता खालीलप्रमाणे निर्देश कायदयात व शासन निर्णयात देण्यात आले आहेत.**

प्रत्येक व्यवस्थापन / मालक **लेखी आदेशाने** आपआपले कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती स्थापन करेल. कार्यालये, प्रशासकीय शाखा विविध ठिकाणी असतील किंवा विभागीय व उपविभागीय पातळीवर असतील तर त्या सर्व ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करावी लागेल. अंतर्गत तक्रार समिती मध्ये व्यवस्थापन / मालक खालील सदस्य नामार्दिशित करेल.

१. पीठासीन अधिकारी **अध्यक्ष** म्हणुन कर्मचाऱ्यामधील **वरिष्ठ पातळीवरील कर्मचारी महिला**. जर अशी अधिकारी / कर्मचारी महिला नसेल तर अन्य कार्यालये प्रशासकीय शाखामधुन वरिष्ठ पातळीवरील कर्मचारी महिला निवडता येईल आणि तेथेही नसेल तर अन्य खाती किंवा अन्य मालकीच्या कंपनी मधुन निवडता येईल.

**२. स्त्रियांबद्दल बांधिलकी असलेले किंवा सामाजिक कामाचा अनुभव असलेले किंवा कायदेशीर ज्ञान असलेले कमीतकमी दोन कर्मचारी.**

३. **लैगिंक छळ विषयावर बांधिलकी** असलेल्या संस्था, संघटनांमधील एक सदस्य किंवा या प्रश्नांवर काम करणारी व्यक्ती **(अशासकीय सदस्य).**

एकुण सदस्यांपैकी **निम्मया महिला सदस्य** असल्या पाहिजेत. **सदस्यांची मुदत ३ वर्ष राहिल.** दर तीन वर्षानी समिती पुर्नगठीत करण्यात यावी. अशासकीय सदस्यांना भत्ता व प्रवासखर्च कायदयातील तरतुदीनुसार देण्यास मालक जबाबदार असेल. **अंतर्गत तक्रार समिती स्थापन झाल्यावर समितीचा आदेश तसेच लैगिंक छळाची व्याख्या आणि त्या संदर्भात होणारी कायदेशीर कार्यवाही कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी लावण्यात यावी.**

सर्व कार्यालयानी समिती स्थापन केलेल्या समिती आदेशाची प्रत आणि ज्या कार्यालयात १० पैक्षा कमी कर्मचारी कार्यरत असल्यामुळे सदर समिती स्थापन होऊ शकत नसेल तर तसे देखील कर्मचाऱ्यांच्या यादीसह अभिलेखासाठी **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, गडचिरोली , बॅरेक क्रं.१, खोली क्रं.२५,२६ जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कॉम्पलेक्स, गडचिरोली** या कार्यालयास लेखी पोस्टाने अथवा ई मेल dwcdgadchiroli@gmail.com वर दयावे.

जिल्हा अधिकारी स्थानिक तक्रार निवारण समिती
तथा निवासी उपजिल्हाधिकारी गडचिरोली